मकाद क्र. २०३ (203)
पालघर

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वन विभाग


दुरध्वनी क्र.02528-222337
ई-मेल:- dycfdahanu@mahaforest.gov.in

**उप वनसंरक्षक डहाणू वनविभाग, डहाणू यांचे कार्यालय**
डहाणू आगर रोड,पंचायत समिती,डहाणू कार्यालया शेजारी,
डहाणू, जि.पालघर पिन नं. 401 601


जा.क्र.अ/जमिन/ १४८० /२०२२-२०२३ डहाणू ४०१ ६०१,दिनांक १४/०२/२०२३

प्रति
सदस्य सचिव
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक
कांदळवन कक्ष, मुंबई.

विषय - श्री.अशोक पांडे, गाव चिमणे (कांडोलपाडा) मौजे खानिवडे तालुका वसई हददीत तिवरांची कत्तल करुन रेती उत्खनन करणा-यावर कारवाई करणे बाबत.

संदर्भ - १.आपले कार्यालयाचे जा.क्र.ल ले/कां स/२०३ दिनांक ०८.१२.२०२२
२. वनक्षेत्रपाल भाताणे यांचेकडील जा.क्र.ब/जमिन/४८८ दि.१०.०१.२०२३

उपरोक्त संदर्भ क्रमांक ०१ अन्वये श्री.अशोक पांडे, रा वसई यांनी गाव चिमणे (कांडोलपाडा) मौजे खानिवडे, तालुका वसई हददीत तिवरांची कत्तल करुन मोठया प्रमाणात रेती उत्खननाचे काम चालू असल्याची तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदर प्रकरणी वनक्षेत्रपाल भाताणे यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. वनक्षेत्रपाल भाताणे यांनी संदर्भ क्रमांक ०२ अन्वये अहवाल सादर केला आहे.

सदर ठिकाणी संपूर्ण परिसरात खाडीलगतच्या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची तिवरांची तोड झालेली असल्याचे तसेच अवैध रेतीचे उत्खनन झालेचे दिसुन येत नाही.

(मधुमिथा एस)
उपवनसंरक्षक
डहाणू वनविभाग,डहाणू

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 4840 दिनांक: 28/2/23.

प्रशासकीय अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

Mangrove Committee

(20)

close

(203)

Gmail

APCCF Mangrove cell <ccfmmumbai@gmail.com>

# Fwd: कांदळवन तक्रार क्र .२०३ , ता. वसई जि. पालघर.pdf

1 message

**Collector Palghar** <collectorpalghar@gmail.com> Fri, Jul 28, 2023 at 12:32 PM
To: ccfmmumumbai@gmail.com, CCF Mangrove cell <ccfmmumbai@gmail.com>

कृपया सोबत जोडलेली फाईल डाऊनलोड करून पहा.

आपला विश्वासू,
गोविंद बोडके (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर
जिल्हा मुख्यालय पालघर,
पालघर- बोईसर रोड, कोळगाव ता. पालघर, जि. पालघर, पिन 401404
कार्या. दूरध्वनी :- 02525 - 253111
*कागद बनविणेसाठी वृक्षतोड केली जाते. झाडे लावा, झाडे वाचवा.*
*कृपया अगदी जरुरी असेल, तरच प्रिंट काढावी .*

---

**कांदळवन तक्रार क्र .२०३ , ता. वसई जि. पालघर.pdf**
5983K

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 1525 दिनांक: 28 JUL 2023
प्रशासकीय अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

Mangrove comm

## कांदळवन तोड झालेल्या तक्रारीच्या पुर्तता अहवालाचा नमुना -१

**तक्रार क्रमांक :- (२०३)**

| अ.क्र | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.अशोक पांडे |
| २ | तक्रारीचा विषय | खारफुटीचा नाश |
| ३ | तक्रारीशी संबंधीत जागेचा तपशिल उदा.स.नं.,गावाचे नाव तालुका | मौजे खानिवडे, चिमणे,(कांडेलपाडा) ता.वसई येथिल १०० एकर जागेतून तिवरांचा कत्तल करून मोठयाप्रमाणे रेती उत्खन्न झाले बाबतची तक्रार |
| ४ | चौकशी करणाऱ्याचे नावे व पदनाम | अध्यक्ष कांदळवन संवर्धन समिती तालुका वसई |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | या जमीनीवरील कांदळवानाचे नुकसान झाले नाही. |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | कांदळवनाच्या ऱ्हास झाला नाही. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक दिनांक व संबंधित पोलीस | प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०७/२०२३ रोजी स्थळ पाहणी केली असता, प्रस्तुत जागेवर कांदळवनाची तोड / ऱ्हास झाल्याचे आढळून आलेले नाही. तसचे सदर जागेमध्ये तुरळक प्रमाणात बाभुळ जातीचे झाडे दिसून आली आहे सदर जागेची G.P.S.मशिनद्वारे पॉलीगॉन घेण्यात आले, सदर पॉलीगॉन वरुन सन २०१४,२०१५ व २०२३ ची गुगल इमेज काढले असून शेतजमीनीचे खाचरे दिसून आहे.त्यामुळे प्रस्तुतची तक्रार आपल्या स्तरावरून निकाली काढणेस विनंती आहे. |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तीचा नावे व पत्ता | निरंक |
| ९ | कोणत्या कायद्यांतर्गत/कलमांतर्गत गुन्हा दाखल केला त्यांचे वर्णन | निरंक |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

अध्यक्ष कांदळवन संवर्धन समिती
तथा उपविभागीय अधिकारी वसइ

(03)

# "THE VOICE OF VASAI PEOPLE" (Proposed)


**PRESIDENT – ASHOK PANDEY – Mob. 9371071257**

**Office – 762, Sambhaji Nagar, Navghar, Vasai Rd.(E) Palghar - 401202**


Date :- 28.10.2022

प्रति,

मा० विभागीय आयुक्त,
कोकणभवन, नवीमुंबई

मा० जिल्हाधिकारी, पालघर

मा० प्रांत अधिकारी, वसई

मा० तहसीलदार, वसई

निवेदन

जिल्हाधिकारी कार्यालय पालघर
आवक ... क्रमांक ...
28 OCT 2022
(नि.उ.जि./उ.जि. सा.प्र.) जिल्हाधिकारी

CPL/22/22990

विषय :- तालुका - वसई, मौजे - पाणिवडे, गांव - निमणे (काडोलपाडा) हद्दीत तिवरांची कत्तल करून शेती उत्पन्न करण्यावर कारवाई करणे बाबत तक्रार अर्ज —

महोदय,

वरिल विषयान्वये आपणांस निदर्शनास आणून देतो की, कायद्याप्रमाणे तिवरांची कत्तल करणे गुन्हा आहे, तरी ही मौजे - पाणिवडे - गांव - निमणे (काडोलपाडा) येथे १०० एकर जागेतून तिवरांची कत्तल करून मोठ्या प्रमाणात शेती उत्पन्न झाले आहे व सुरु आहे.//

संघटने तर्फे मागणी करण्यात येत आहे की, तात्काळ उच्च स्तरीय चौकशी करून गैरप्रकारे शेती उत्पन्न व तिवरांची कत्तल करण्यावर गुन्हा दाखल करून त्यांचे साहित्य जप्त करावे व केलेली कारवाईचे एक प्रत मला पाठविण्यात यावे. धन्यवाद!

आपले नम्र

(अशोक पांडे)
अध्यक्ष

VVS-1437/2022
प्राप्त दिनांक 2 NOV 2022
अ.का.

3109

03

जा.क्र./तलाठी था.नि./४७७/२०२३
तलाठी सजा खानिवडे
दि. २८/०२/२०२३

प्रति,
मा.तहसीलदार सो. वसई
ता.वसई जि.पालघर

विषय : मौजे खानिवडे ,चिमणे व हेदवडे बंदर पाहणीबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरून अहवाल सादर करते कि, दि.२७.०२.२०२३ रोजी सायंकाळी ५.२२ च्या दरम्यान मौजे खानिवडे हेदवडे व चिमणे येथील रेती बंदरांची पाहणी केली असता खानिवडे बंदर क्र.१ हेदवडे बंदर क्र.२ व ३ व चिमणे येथील बंदर क्र. ४ व ५ तसेच चिमणे येथील मंगलडोह या बंदर परिसरात कोणत्याही प्रकारचा रेतीसाठा ,कुंड्या , सक्शन पंप ,रेती वाहतूक करणाऱ्या बोटी अथवा वाहने आढळून आल्या नसून सर्व बंदरे हि पूर्णपणे बंद अवस्थेत आहेत .सदरची स्थानिक चौकशी करून केलेला पंचनामा सोबत जोडत आहे.

तलाठी सजा खानिवडे
ता.वसई जि.पालघर

तलाठी सजा खानिवडे

तहसीलदार कार्यालय, वसई
संदर्भ:- गौ.ख.
- 1 MAR 2023
अ.का. लि.म.प्र. तहसीलदार

(०३)

F:\ NEW2016\ASHISH\PALGHAR COLL LETTER.DOCX

# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय

## (महसूल शाखा)

किल्ला बंदर रोड, मालोंडे, वसई गांव, ता. वसई, जि. पालघर पिन - ४०१ २०१.

दुरध्वनी क्र. (०२५०) २३२२००७

===================================

क्रमांक/मशा/गौणखनिज/कावि-३५७/२०२३
दिनांकः-३/४/२०२३

प्रति,

मा. जिल्हाधिकारी पालघर
(रेतीगट शाखा)

विषय :- मौजे खानिवडे, चिमणे व हेदवडे बंदर पाहणीबाबत..

संदर्भ:- तलाठी सजा खानिवडे यांचेकडील जा.क्र./तलाठी बा.नि.४७७/२०२३
दि. २८/०२/२०२३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रानुसार सविनय सादर करण्यात येते की. दि. २७/०२/२०२३ रोजी सायंकाळी ५.२२ च्या दरम्यान तलाठी सजा खानिवडे यांनी मौजे खानिवडे, हेदवडे, चिमणे येथील रेती बंदरांची पाहणी केली असता मौजे खानिवडे बंदर क्र. १, हेदवडे बंदर क्र. २ व ३ व चिमणे येथील बंदर क्र. ४ व ५ तसेच मंगलडोह या बंदर परिसरात कोणत्याही प्रकारचा रेतीसाठा, कुंडया, सक्शन पंप. रेती वाहतुक करणाऱ्या बोटी अथवा वाहने आढळून आल्या नसुन सर्व बंदरे ही पूर्णपणे बंद अवस्थेत आढळुन आली आहेत.

तरी तलाठी यांनी केलेल्या पाहणीनुसार सदरचा अहवाल सविनय सादर करीत आहोत.

तहसिलदार वसई

प्रत:- मा. उपविभागीय अधिकारी वसई यांना माहितीसाठी सविनय सादर..

# मंडळ अधिकारी मांडवी यांचे कार्यालय

पत्ता - तलाठी कार्यालय शिरसाड फाटा, पो.मांडवी, ता.वसई, जि.पालघर

---

जा.क्र.मं.अ.मां / चिमणे / कावि - १७१/२०२३ दि. १२ / ०७ / २०२३

प्रति,

मा. उपविभागीय अधिकारी वसई,

उपविभागीय अधिकारी वसई यांचे कार्यालय
संकलन : 14 JUL 2023
अ. का. शिरस्तेदार उ. वि. अ.

विषय :- मा.उपविभागीय अधिकारी, तथा उपविभागीय दंडाधिकारी वसई यांचे कडील पत्र क्र. क्रिडी/ट- २/जमिन बाब / कावि-४२३/२०२३ दिनांक १८/०५/२०२३

संदर्भ :- परिमंडळ वनअधिकारी उंबरपाडा यांचे कडील पत्र क्रमांक जा.क्र.१२४/सन २०२३-२४ दिनांक १०/०७/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रांन्वये दिनांक ०४/०७/२०२३ रोजी मा.उपविभागीय अधिकारी वसई व मा. तहसिलदार सो.वसई यांनी मौजे. चिमणे येथील उंबरपाडा रेती बंदर व श्री. संजोग घरत यांचे मालकी जागेची पहाणी केली असून त्याकामी परिमंडळ वनअधिकारी उंबरपाडा यांना वरील जागेचे सन २०१४ ते सन २०२३ चे गुगल ईमेज सादर करणे बाबत कळविले होते. त्याअनुषंगाने परिमंडळ वनअधिकारी उंबरपाडा यांनी दिनांक ११/०७/२०२३ रोजी वरील जागेचे सन २०१४ - २०२३ चे गुगल ईमेज व त्यांचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला असून त्यांत मौजे. चिमणे येथील सर्व्हे नंबर ७५ मध्ये श्री. संजोग घरत यांचे घर असून सदर जागेत सन २०१४ व सन २०१५ च्या गुगल इमेज मध्ये सदर जागेत शेतीचे खाचर असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच स.नं. ५३ मध्ये आज रोजी श्री. संजोग घरत यांनी भरती-ओहटीचे वेळेस येणाऱ्या पाण्यामुळे जमिन खचत असल्याने सदर जागेत दगड-माती व डेब्रिज (नाशिवंत मटेरीअल) सुमारे १५० ते २०० ब्रास टाकून भराव केल्या बाबत यापूर्वी या कार्यालयाकडून अहवाल व पंचनामा सादर केलेला आहे. स.नं. ५३ चे सन २०१४-२०१५ चे गुगल इमेज व परिमंडळ वनअधिकारी उंबरपाडा याचे कडील अहवाल पहाता कांदळवन असल्याचे दिसून येत नाही.

तसेच मंगलडोहा रेती बंदराचे सन २०१४ - २०२३ चे गुगल इमेज जोडले आहेत.

सोबत परिमंडळ वनअधिकारी उंबरपाडा यांनी सादर केलेला अहवाल, सोबत जोडलेले गुगल इमेज व कार्यालयाकडून यापूर्वी सादर केलेल्या अहवालाची प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

12/07/23

मंडळ अधिकारी मांडवी
ता.वसई
मंडळ अधिकारी
मांडवी

विषय: महसूल विभाग व वनविभाग यांच्या मौजे खानिवडे व हेदवडे येथील कांदळवन क्षेत्र पाहणी दौरा व जागेचे गुगल ईमेज सादर करणे बाबत.
जा.क्र. /24/ सन. 2023-24
उंबरपाडा, दिनांक - 10/07/2023

प्रति
मा. मंडळ अधिकारी
शिरसाड.

संदर्भ :- मा. उपविभागीय अधिकारी, तथा उपविभागीय दंडाधिकारी, वसई यांचे कडील पत्र क्र.-विडी/है.21 जमिन बाब/कावि-423/2023, दिनांक-18/05/2023

महोदय,
उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सविनय रिपोर्ट सादर करितो की, वसई तालुक्यातील कांदळवन संरक्षण व संवर्धन तसेच रेती उत्खनन या संबधी दिनांक 04/7/2023 रोजी मा. उपविभागीय अधिकारी साहेब, वसई. मा. तहसिलदार वसई. मा. मंडळ अधिकारी साहेब, शिरसाड व तलाठी सजा, खानिवडे यांचे सह रेती उत्खनन होते कींवा कसे याबाबत मंगल डोह, चिमणे येथे प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता कोणत्याही प्रकारचे रेती उत्खनन होत नसल्याचे दिसून आले त्यानंतर श्री संजोग घरत यांच्या मालकी जागेची पाहणी केली. प्रत्यक्ष जागेवर कोणत्याही प्रकारचे कांदळवन तोडलेले नसल्याचे दिसून आले. तुरळक प्रमाणात बाभुळ जातीचे झाडे दिसून आली. कामी सदर दोन्ही जागेचे G.P.S. मशिन द्वारे पॉलीगॉन घेण्यात आले. सदर पॉलीगॉन वरून सन 2014, 2015 व 2023 ची गुगल इमेज काढले. श्री संजोग घरत यांचे जागेच्या सन. 2014 व सन 2015 च्या गुगल इमेज मध्ये तानसा नदीचे पात्र हे त्यांच्या मालकी क्षेत्रापासून दूर आहे, व त्या क्षेत्राला लागून दिसून येत नाही. तसेच सन 2014 व 2015 च्या इमेज मध्ये श्री घरत यांच्या मालकी क्षेत्रात व बाजूबाजूच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात शेतीची खाचरे दिसून येत आहेत व कोणत्याही प्रकारची कांदळवन दिसून येत नाही. तसेच मंगल डोह येथील रेती उत्खनन बाबतचे सन 2014, 2023 चे गुगल इमेज जोडून सोबत देत आहोत माहीती व पुढील कार्यवाही साठी सविनय सादर

R.S. Dhomse
परिमंडळ वनअधिकारी
उंबरपाडा

# मंडळ अधिकारी मांडवी यांचे कार्यालय

पत्ता - तलाठी कार्यालय शिरसाड फाटा, पो.मांडवी, ता.वसई, जि.पालघर

---

जा.क्र.मं.अ.मां /चिमणे/ कावि - १६६/२०२३ दि. ०५ / ०७ /२०२३

प्रति,
मा.तहसिलदार वसई,

**विषय :- मौजे. चिमणे येथील स.नं. ७५ व ५३/३ या जागेतील कांदळवन पहाणी बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये अहवाल सादर करणेत येतो की, दिनांक ०४/०७/२०२३ रोजी मा.उपविभागी अधिकारी वसई, व मा. तहसिलदार सो. वसई, तलाटी सजा खानिवडे व वन विभागाचे अधिकारी/कर्मचारी समवेत मौजे. चिमणे येथील स.नं. ७५ व स.नं. ५३/३ या जागेची पहाणी केली असता स.नं. ७५ ही जमिन ७/१२ सदरी श्री. संजोग बळीराम घरत यांचे नावे दाखल असून आज रोजी सदर जागेत रहिवास प्रयोजनार्थ घर बांधलेले आहे. प्रस्तुत स.नं. ७५ ही जमिन श्री. संजोग घरत यांनी सन २०२१-२२ च्या सुमारास खरेदी केलेली असून यापर्वीचे जमिन मालक सदर ठिकाणी भात शेती करत असल्या बाबत पंचांचे मत आहे. तसेच सदर जागेत यापूर्वी टिवरांची झाडे नसल्याबाबत पंचांनी पंचनाम्यात लिहून दिलेले आहे. तसेच स.नं. ५३/३, ला लागून असलेले स.नं. ५४, ५२, ६४, २४, २८, २९, ३०, ३१ इ. सर्व्हे नंबर पहाता ते पाण्याखालील गेलेले असून स.नं. ५३/३ ला लागून असल्याने खाडी किनारी भरती ओहटी मुळे स.नं. ५३/३ खचत असल्यामुळे सदर जागेत जमिन मालक श्री. संजोग बळीराम जाधव यांनी दगड-माती व डेब्रिज (नाशिवंत मटेरीअल) सुमारे १५० ते २०० ब्रास टाकलेले दिसून आलेले आहे. सदर भरावा बाबतच्या रॉयल्टी / शासनाची परवानगी अर्जदार परस्पर आपले कार्यालयास सादर करणार आहेत. सदर भरावाखाली कांदळवन गाडल्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रस्तुत प्रकरणी वरील सर्व्हे नंबर च्या जागेचे मागील काही वर्षा पूर्वीचे गुगल मॅप देणे बाबत उपस्थीत वन विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांना कळविले आहे. तरी सदर गुगल मॅप उपलब्ध झाल्यावर वरील सर्व्हे नंबर च्या जागेत तिवरांच्या झाडांची कत्तल झाली आहे अगर कसे या बाबत ची निश्चत माहीत मिळेल व योग्य ती कार्यवाही करणे सोईस्कर होईल.

तरी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत जागेवर केलेला पंचनामा व तलाटी सजा खानिवडे यांनी यापूर्वी सादर केलेल्या अहवालाची छायाप्रत जोडली आहे.

5/7/23

मंडळ अधिकारी मांडवी
ता.वसई, जि.पालघर
मंडळ अधिकारी
मांडवी

महसूल सहाय्यक
आवक जावक विभाग
तहसिलदार कार्यालय,वसई

दि. ०४/०७/२०२३

मंडळ अधिकारी मांडवी ता. वसई जि. पालघर यांचेसमोर

पंचनामा - आम्ही खालील सह्या करणार पंचाचे रा. चिमणे ता. वसई जि. पालघर आपला जागेवर हजर राहुन विचारले वरुन पंचनामा लिहुन देतात की आज दि. ०४/०७/2023 रोजी मा. उपविभागीय अधिकारी वसई मा. तहसिलदार वसई यांचे समवेत मौजे चिमणे येथील स.नं. ७५ व ५३/३ या जागेची पाहणी केली असता स.नं. ७५ मध्ये श्री. संतोष बाळीराम घरत यांचे घर असून स.नं. ५३/३ या जागेत माती दगड व डेब्रीज यांची भरणी केलेली आहे. सदर भरावा-बाबत त्यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी येथल्ये असल्याबाबत कळविले असून ते परस्पर सादर करणार आहेत. प्रत्यक्ष वरील स.नं.च्या जमिनी श्री संतोष बाळीराम घरत यांनी सन 2021 च्या सुमारास खरेदी केलेल्या असून सदर जागेवर यापूर्वीचे जमीन मालक भातशेतीची लागवड करीत होते. सदर जागेत कुठल्याही प्रकारे खोदकाम दिसून आले नाही. किंवा खोदकामाची कत्तल केलेली दिसून आली नाही. तरी आज रोजी जागेवर केलेल्या भरावाबाबत संबंधीतांना विचारणा केली असता समुद्राच्या पाण्यामुळे (भरती ओहोटी) हुडे जमिनीचा किनारा खचू नये यामुळे जमिनीच्या किनाऱ्या लगत डेब्रीज व दगड मातीची भरणी केल्याचे सांगितले तसेच सदर जागेत घरालगत आंब्याची ५० झाडे व नारळाची ४० झाडे लागवड केलेली आहेत

हा पंचनामा लिहुन दिला आहे

समक्ष

मंडळ अधिकारी
मांडवी

तलाठी सजा-चांदनवाडी
ता. वसई, जि. पालघर

पंचांच्या सह्या

हरी वा. पाटील

(१) श्री. हरी वाडुरंग पाटील
(पोलीस पाटील चिमणे)

# मंडळ अधिकारी मांडवी यांचे कार्यालय

प्त्ता - तलाठी कार्यालय शिरसाड फाटा, पो.मांडवी, ता.वसई, जि.पालघर

-----------------------------------------------------------------------

जा.क्र.मं.अ.मां /चिमणे/ कावि - १६५/२०२३ दि. ०५ / ०७ /२०२३

प्रति,
मा.तहसिलदार वसई,

विषय :- मौजे. चिमणे कांदळवन पहाणी बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये अहवाल सादर करणेत येतो की, दिनांक ०४/०७/२०२३ रोजी मा.उपविभागी अधिकारी वसई, व मा. तहसिलदार सो. वसई, तलाटी सजा खानिवडे व वन विभागाचे अधिकारी/कर्मचारी आपण मौजे. चिमणे येथील मंगलडोहा या रेतीबंदाची पहाणी असता बंदर / खाडी किनारी कांदळवनाची कत्तल झाल्याची दिसून आलेली नाही तसचे बंदर / खाडी किनारी एका बाजूने तुरळक कांदळवनाची झाडे आहेत. आज रोजी सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारे कांदळवनाची कत्तल करून रेती उत्खनन, रेती साठा केल्याचे दिसून आलेले नाही तसेच आज सदर ठिकाणी जुन्या व बंदअवस्थेत असलेल्या रेती साठवणूकीच्या कुंड्या तीन ते चार कुंडया दिसून आल्या. आज रोजी सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारे रेती उत्खनन व वाहतुक होत नसल्याबाबत दिसून आलेले आहे या बाबत जागेवर पंचनामा केला असून प्रकरणी सादर करीत आहे.

तरी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

५/७/२३

मंडळ अधिकारी मांडवी
ता.वसई, जि.पालघर
मंडळ अधिकारी
मांडवी

५/७/२०२३

महसूल सहाय्यक
आवक जावक विभाग
तहसिलदार कार्यालय, वसई

मंडळ अधिकारी मांडवी ता. वसई जि. पालघर यांचेसमोर

पंचनामा - आम्ही खालील सह्या करणारे पंचलोक रा. चिमणे ता. वसई जि. पालघर समक्ष जागेवर हजर राहून विचारले वरून पंचनामा लिहून देतात की आज रोजी दि. 07/07/2023 रोजी मा. उपविभागीय अधिकारी वसई, मा. तहसिलदार वसई यांच्या समवेत मौजे चिमणे येथील मेगाळ डोह येथील रेती बंदराची पाहणी केली असता आज रोजी सदर ठिकाणी कुठल्याहि प्रकारे कांदळवण झाडलून आले नाही. तसेच कांदळवणाची कत्तल केलेली दिसून आली नाही. तसेच रेती बंदराची पाहणी केली असता आज जागेवर बंद व मोडलेल्या अवस्थेत असलेल्या रेतीच्या कुंड्या दिसून आल्या आज रोजी रेती बंदर बंद असून कुठल्याहि प्रकारे रेती उत्खनन अथवा रेती साठा आढळून आलेला नाही.


हा पंचनामा लिहून दिला असे.

पंचांच्या सह्या
हरिपा.पाटील
१) श्री. हरि पांडुरंग पाटील
(पोलीस पाटील चिमणे)


[signature] 07/07/23
मंडळ अधिकारी
मांडवी

[signature]
तलाठी सजा-[illegible]
ता. वसई, जि. पालघर


Legend
THAKRE BANDAR12:23 PM
07/05/2023
Vaitarna Tansa Sangam ( वैतरणा...
THAKRE BANDAR12:23 PM
Google Earth
Image © 2023 Airbus
60 m
N


Legend
THAKRE BANDAR12:23 PM
07/05/2014
Vaitarna Tansa Sangam
Google Earth
N


Legend
SANJOG GHARAT
05/07/2023
SANJOG GHARAT
Google Earth
Image © 2023 Airbus
Image © 2023 Maxar Technologies
N
100 m



Legend
05/07/2014
Google Earth
100 m
N

श्री संजोग बळीराम घरत
दिनांक ०४/०७/२०२३



दि ०४/०७/२०२३





श्री संजोग बळीराम घरत दि ०४/०७/२०२३



श्री संजोग बळीराम घरत दि ०४/०७/२०२३

...फादळवैनी संवर्धन समिती
तथा उपविभागीय अधिकारी वसई


3/30/2015
2007
2017
Image © 2023 Maxar Technologies
47 m
Activate Windows
Go to Settings to activate Windows.


3/30/2015
2007
2017
Image © 2023 Maxar Technologies
87 m
Activate Windows
Go to Settings to activate Windows.

